समाज जागृती शिक्षण संस्था मुरूड द्वारा संचलित,

# संभाजी महाविद्यालय,मुरूड ता.जि.लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

(शैक्षणिक वर्ष २०२०—२१)

## नियमित कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल

---

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग "NOT ME BUT YOU" हे ब्रीदवाक्य घेवुन विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षण घेत असतानाच राष्ट्रभावना निर्माण करण्यासाठी तसेच सामाजिक बांधिलकीची भावना जोपासण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे यासाठी हा विभाग अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असतो. २०२०—२१ हे संपूर्ण वर्ष कोविड—१९ च्या महामारीने कांही अंशी ऑनलाईन व कांही अंशी ऑफलाईन गेले. विद्यार्थी आपल्या घरी राहुनच आपल्या कार्यक्रमात ऑनलाईन सहभागी झाले इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी शासनाच्या सर्व नियमांच्या अधीन राहून व या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून उपस्थित होते. कोविड—१९ च्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजात नागरिकांनी घ्यावयाची काळजी, उपाययोजना याविषयी जनजागृती करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२०—२१ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून कोविड—१९ च्या सर्व नियमांचे पालन करून ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने विविध प्रकारचे कार्यक्रम, उपक्रम जसे की वृक्षारोपन, विविध महापुरूषांच्या जयंती पुढील प्रमाणे घेण्यात आले. त्याचा सविस्तर वृत्तांत खालील प्रमाणे आहे.

**१) म.जोतिराव फुले जयंती :—**

११ एप्रिल २०२० रोजी म.जोतिराव फुले यांची जयंती कोरोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे वर्क फ्रॉर्म होम या पध्दतीने शासनाच्या नियमांचे पालन करून साजरी करण्यात आली. यावेळी माजी पोस्टमास्तर आयु.अच्युतराव आल्टे यांच्या शुभहस्ते प्रतिमा पुजन करून म.जोतिराव फुले यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. चावरे एम.व्ही., प्रा.महेंद्र आल्टे, चि.हर्षवर्धन व चि.राजवर्धन उपस्थित होते.

**२) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती :—**

१४ एप्रिल २०२० रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कोरोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे वर्क फ्रॉर्म होम या पध्दतीने शासनाच्या नियमांचे पालन करून साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही यांच्या शुभहस्ते प्रतिमा पुजन करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी चि. संघर्ष चावरे, चि. सम्राट चावरे उपस्थित होते.

**३) आंतरराष्ट्रीय योग दिवस :—**

२१ जुन २०२० रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आंतरराष्ट्रीय योग दिन वर्क फ्रॉर्म होम या पध्दतीने शासनाच्या नियमांचे पालन करून साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही यांनी प्राणायाम व योगासने केली. यामध्ये अनुलोम विलोम, सुर्यनमस्कार, कपाभारती, भ्रामरी, शीर्षासन इत्यादी आसने केली. या आसनांमध्ये चि.संघर्ष चावरे, चि.सम्राट चावरे यांनी देखील सहभाग घेतला.

**४) राजर्षी शाहु महाराज जयंती :—**

२६ जुन २०२० रोजी राजर्षी शाहु महाराज यांची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांनी राजर्षी शाहु महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी राजर्षी शाहु महाराज यांच्या जीवन कार्याचा आढावा घेवुन सामाजिकविषयक विचार

स्पष्ट केले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही. यांनी उपस्थितांचे आभार मानुन कार्यक्रमाची सांगता केली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**५) साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी :—**

१ ऑगस्ट २०२० रोजी महाविद्यालयात साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त महापुरूषांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही यांच्या शुभहस्ते महापुरूषांच्या प्रतिमांचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सदस्य प्रा. चव्हाण डी.आर व सेवक सुनिल गाडे उपस्थित होते.

**६) स्वातंत्र्य दिन साजरा :—**

१५ ऑगस्ट २०२० रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालयात सकाळी ठिक ७.५० मिनिटांनी स.जा.शि.संस्थेचे सचिव ॲड.विजय पाटील यांच्या हस्ते म.गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करून महाविद्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले. क्रीडासंचालक प्रा.एम.टी.क्षीरसागर यांनी परेड संचलन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी, कार्यक्रमाधिकारी, समिती सदस्य व महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**७) सद्भावना दिन :—**

२० ऑगस्ट २०२० रोजी भारताचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात सद्भावना दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांच्या हस्ते स्व.राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य व कार्यक्रमाधिकारी यांनी उपस्थितांना सद्भावनेची शपथ दिली.

**८) राजीव गांधी सद्‌भावना दिन व आंतरराष्ट्रीय युवा दिन सप्ताहानिमित्त :—**

राजीव गांधी सद्‌भावना दिन व आंतरराष्ट्रीय युवा दिन सप्ताहानिमित्त ३१ ऑगस्ट २०२० रोजी HIV व Covid-19 याविषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणुन मा.प्रताप विनायकराव लोमटे यांनी मौलिक स्वरूपाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र माळी उपस्थित होते. या ऑनलाईन कार्यक्रमास स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम. व्ही. यांनी मानले.

**९) वृक्षारोपन कार्यक्रम :—**

०४ सप्टेंबर २०२० रोजी महाविद्यालय परिसरात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीच्या पुर्वदिनी वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांच्या हस्ते तीस अशोका वृक्षांचे वृक्षारोपन करण्यात आले. याप्रसंगी समिती सदस्य प्रा. डॉ.गोरे बी.एम.,प्रा.डॉ.मीना कदम, प्रा.चव्हाण डी.आर. व महाविद्यालयातील प्रा.डॉ.आंबाड आर.एफ., प्रा.डॉ.कानडे ए.एस., प्रा.बिडवे एम.एस., श्री.चौभारकर व्ही.सी. उपस्थित होते. ताळेबंदी असल्या कारणाने महाविद्यालयात स्वयंसेवक उपस्थित राहु शकले नाही त्यामुळे वृक्षारोपन प्रसंगी महाविद्यालयातील सेवक श्री.बंकट घुटे, श्री.सुनिल गाडे, श्री.अरूण सवासे, श्री.देशमुख बी.बी यांनी श्रमदान केले.

**१०) शिक्षक दिन साजरा :—**

०५ सप्टेबर २०२० रोजी महाविद्यालयात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधुन रा.से.यो.च्या वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करून मार्गदर्शनही केले. यावेळी ते म्हणाले की, शिक्षक हा देशाचा आधारस्तंभ आहे म्हणून राष्ट्रविकासात शिक्षकाची भूमिका महत्वाची आहे. शिक्षकांवरतीच संपूर्ण देशाची धुरा अवलंबुन आहे म्हणून संस्कारक्षम

पिढी घडविणे हे शिक्षकाचे आद्य कर्तव्य आहे. याप्रसंगी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**११) म.गांधी व लालबहाद्दूर शास्त्री जयंती :—**

०२ ऑक्टोबर २०२० रोजी महाविद्यालयात म.गांधी व लालबहाद्दूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स.जा.शि.संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.बी.एस.(दादा) पटाडे यांच्या शुभहस्ते महापुरूषांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांनी देखील महापुरूषांना अभिवादन केले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी, समिती सदस्य व शिक्षक—शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**१२) संविधान दिन साजरा :—**

२६ नोव्हेंबर २०२० रोजी महाविद्यालयात भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले तर कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही यांनी भारतीय संविधानातील मानवी मूल्यांवरती प्रकाश टाकला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**१३) महापरिनिर्वाण दिन :—**

०६ डिसेंबर २०२० रोजी भारतरत्न, विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त रा.से.यो.च्या वतीने अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांनी भारतरत्न, विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून भावपुर्ण आदरांजली वाहिली. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही., समिती सदस्य, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उपस्थित राहुन आदरांजली वाहिली.

**१४) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती :—**

महाविद्यालयामध्ये रा.से.यो. व सावित्रीबाई फुले मंच यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०३ जानेवारी २०२१ रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्रातील थोर विचारवंत मा.डॉ.सुरेश वाघमारे यांच्या ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ.वाघमारे म्हणाले की, स्त्रियांच्या उत्थानासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणाऱ्या भारतातील पहिल्या शिक्षिका आणि मुख्याध्यापिका या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आहेत. त्यांचा विचार आत्मसात करून आजच्या स्त्रियांनी मार्गक्रमण करावे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रास्ताविक प्रा.डॉ.मीना कदम यांनी केले तर या आभासी कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही. यांनी मानले. या आभासी कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी होते.

**१५) राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती :—**

महाविद्यालयाच्या रा.से.यो.च्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती १२ जानेवारी २०२० रोजी साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांना अभिवादन करण्यात आले.

राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधुन दि.१५ जानेवारी २०२१ रोजी मा.प्रा.डॉ.अशोक गायकवाड यांच्या ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून जिजाऊंनी स्वराज्यासाठी ज्या पध्दतीने शिवरायांना घडविले तोच आदर्श आजच्या शिक्षकांनी घेवून राष्ट्रनिर्माणासाठी विद्यार्थी घडविणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्रा.डॉ.अशोक गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रास्ताविक समिती सदस्य प्रा.डॉ.गोरे बी.एम. यांनी केले तर

कार्यक्रमाचे आभार प्रा.चव्हाण डी.आर. यांनी मानले. या आभासी कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी होते.

**१६) नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती व बाळ ठाकरे यांची जयंती साजरी :—**

रा.से.यो.च्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती व बाळ ठाकरे यांची जयंती २३. जानेवारी २०२१ साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांच्या शुभहस्ते प्रतिमा पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाधिकारी, समिती सदस्य व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

**१७) भारतीय प्रजासत्ताक दिन :—**

महाविद्यालयात २६ जानेवारी २०२१ रोजी संस्थेचे सचिव मा.ॲड.विजय पाटील यांच्या हस्ते म.गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करून राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी क्रीडासंचालक प्रा.क्षीरसागर एम.टी. यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.चावरे एम.व्ही. व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**१८) संत सेवालाल महाराज जयंती :—**

१५ फेब्रवारी २०२१ रोजी महाविद्यालयात रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी यांनी पुष्पहार अर्पण करून संत सेवालाल महाराज यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले. यावेळी समिती सदस्य प्रा.चव्हाण डी.आर., प्रा.डॉ.गोरे बी.एम., व श्री.सुनिल गाडे उपस्थित होते.

**१९) बाळशास्त्री जांभेकर जयंती :—**

१६ फेब्रुवारी २०२१ रोजी महाविद्यालयात रा.से.यो.च्या वतीने बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस श्री.सुनिल गाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही.,समिती सदस्य प्रा.चव्हाण डी.आर., प्रा.डॉ.गोरे बी.एम. उपस्थित होते.

**२०) छत्रपती शिवाजी महाराज जयंती :—**

१९ फेब्रुवारी २०२१ रोजी रा.से.यो.च्या वतीन स्वराज्यसंस्थापक, कुळवाडीभूषण बहुजनप्रतिपालक छत्रपती शिवाजी राजे भोसले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांनी शिवरायांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**२१) राष्ट्रसंत गाडगे बाबा जयंती :—**

२३ फेब्रुवारी २०२१ रोजी महाविद्यालयात स्वच्छेतेचे जनक राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी यांनी पुष्पहार अर्पण करून राष्ट्रसंत गाडगे बाबा यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले. यावेळी समिती सदस्य प्रा.चव्हाण डी.आर., प्रा.डॉ.गोरे बी.एम., व श्री.सुनिल गाडे उपस्थित होते.

**२२) संत रविदास जयंती :—**

२७ फेब्रुवारी २०२१ रोजी महाविद्यालयात संत रविदास यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रा.डॉ.गोरे बी.एम. यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून संत रविदास यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम.व्ही., समिती सदस्य प्रा.चव्हाण डी.आर.,व श्री.सुनिल गाडे उपस्थित होते.

**२३) यशवंतराव चव्हाण जयंती :—**

१२ मार्च २०२१ रोजी महाविद्यालयात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा.बी.एस.(दादा) पटाडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करून यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.चावरे एम. व्ही. यांनीही महापुरूषांस अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**२४) शहीद दिन :—**

२३ मार्च २०२१ रोजी महाविद्यालयात शहिद दिनानिमित्त सुखदेव, भगतसिंग, राजगुरू या भारतमातेच्या वीरपुत्रांना अभिवादन करण्यात आले. २३ मार्च रोजी इंग्रजांनी ज्यांना फाशी दिली ते म्हणजेच देशासाठी हसत हसत फासावार जाणारे तीन वीरपुत्र यांच्या प्रतिमेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र माळी यांनी पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरपुत्रांचा आदर्श आजच्या तरूणांनी घेणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी भारतमातेच्या  वीरपुत्रांना अभिवादन केले व वीरपुत्रांपुढे सर्व नतमस्तक झाले.

...................................